MHSI06-000810-2022

**सं फौ.ख.क्र. ४१२/२०२२**
**सरकार विरुध्द सुंदर**
**नि.क्र. ६ लगत**

# न्यायनिर्णय

(दिनांक- २४/०६/२०२६ रोजी घोषित)

आरोपी सुंदर बाबु पार्सेकर याचेविरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम २७९, ३३७, ३३८ व मोटार वाहन कायदा कलम १८४, १३०/१७७, ३(१)/१८१ अन्वये संपरिक्षा चालविण्यात आली.

२. अभिलेखावरील पुरावा व आरोपीविरुध्द असलेले दोषारोप पाहता खालील मुद्दे विचारार्थी घेण्यात आले. त्यावरिल निष्कर्ष कारणमिमांसासहित खालील प्रमाणेः-

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक २०/१/२०२२ रोजी १७.३० वाजण्याच्या सुमारास मौजे न्हावेली तिठा येथे आरोपीने त्याच्या ताब्यातील महिंद्रा मॅक्झीमो टेंपो क्र. जी. ए. ०७/एफ-३७१० हे वाहन अविचाराने, हयगयीने, भरधाव वेगात चालवून फिर्यादी यांचे भाऊ रोशन पवार याचे ताब्यातील होंडा शाईन मोटार सायकल क्र. एम्. एच्.०७/ए. एम.६७६३ ला धडक बसून अपघात केला व त्यायोगे आरोपीने भारतीय दंड विधान कलम २७९ खालील | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| | शिक्षापात्र गुन्हा केल्याचे, अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | |
| २. | उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमुद वाहन सार्वजनिक रस्त्यावर बेदरकारपणे, हयगयीने, भरधाव वेगात, रस्त्याच्या विशिष्ट परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन मानवी जिवितास धोका निर्माण होईल अशा प्रकारे चालविल्याने अपघात घडला. त्यामुळे मोटार सायकल चालक रोशन व पाठीमागे बसलेला युवराज यांचे किरकोळ दुखापतीस कारणीभुत झाला व त्यायोगे आरोपीने भारतीय दंड विधान कलम ३३७, खालील शिक्षापात्र गुन्हा केल्याचे, अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | नकारार्थी |
| ३. | उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमुद वाहन सार्वजनिक रस्त्यावर बेदरकारपणे, हयगयीने, भरधाव वेगात, रस्त्याच्या विशिष्ट परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन मानवी जिवितास धोका निर्माण होईल अशा प्रकारे चालवून मोटार सायकल चालक रोशन व पाठीमागे बसलेला युवराज यांचे गंभीर दुखापतीस कारणीभुत झाला व त्यायोगे आरोपीने भारतीय दंड विधान कलम ३३८ खालील शिक्षापात्र गुन्हा केल्याचे, अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | नकारार्थी |
| ४. | उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमुद वाहन हे सार्वजनिक रस्त्यावर भरधाव वेगाने व रस्त्यावरील रहदारी व परिस्थितीचा विचारात न घेता चालविले व त्यायोगे आरोपीने मोटार | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| | वाहन कायदा कलम १८४ खालील शिक्षापात्र गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | |
| ५. | उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमुद वाहन हे त्याच्याकडे वाहन चालविण्याचा परवाना नसताना चालविले व त्यायोगे आरोपीने मोटार वाहन कायदा कलम ३ (१) चे दंडनिय कलम १८१ खालील शिक्षापात्र गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | नकारार्थी |
| ६. | उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमुद वाहन हे सार्वजनिक रस्त्यावर त्याच्याकडे वाहनाचे कागदपत्र सोबत न बाळगता चालविले व त्यायोगे आरोपीने मोटार वाहन कायदा कलम १३० चे दंडनिय कलम १७७ खालील शिक्षापात्र गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | नकारार्थी |
| ७. | आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता केली. |

## कारणमिमांसा

**३.** याकामी अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचे दोषारोप शाबीत करणेकरिता खालीलप्रमाणे साक्षीदार तपासले आहेत.

**अ) अभियोगपक्षाचे साक्षीदार :–**

| **अनु.क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| १. | राजेंद्र रविंद्र पवार | फिर्यादी |

| | | |
|---|---|---|
| २ | गणेश मंगेश जाधव | पंच साक्षीदार |
| ३ | शरद जयदेव धाऊसकर | पंच साक्षीदार |
| ४ | रोशन रविंद्र पवार | जखमी साक्षीदार |
| ५ | युवराज कृष्णा परब | जखमी साक्षीदार |

**ब) बचाव पक्षाचे साक्षीदार असल्यास :–**

| **अनु.क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क) न्यायालयीन साक्षीदार, असल्यास :–**

| **अनु.क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**अभियोगपक्ष, बचाव पक्ष व न्यायालयीन निशाणीची यादी**

**अ) अभियोग पक्ष :–**

| **अनु.क्र.** | **निशाणी नंबर** | **निशाणी नंबरचे स्वरुप** |
|---|---|---|
| ०१. | नि.क्र. ०७– स. सा. क्र. १ | फिर्याद |
| ०२. | नि.क्र. ०९– स. सा. क्र. २ | अपघातग्रस्त वाहनांचा पंचनामा |
| ०३. | नि.क्र. ११– स. सा. क्र. ३ | घटनास्थळ पंचनामा |

**ब) बचाव पक्ष :–**

| **अनु.क्र.** | **निशाणी नंबर** | **निशाणी नंबरचे स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क ) न्यायालयीन निशाणी :–**

| **अनु.क्र.** | **निशाणी नंबर** | **निशाणी नंबरचे स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ड) मुद्देमाल तपशील :-**

| **अनु.क्र.** | **मुद्देमाल क्रमांक** | **मुद्देमालाचे स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**४.** आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ (१) (ब) प्रमाणे जबाब नि. ६ लगत नोंदविणेत आलेला आहे.

**५.** दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

**<u>मुद्दा क्र. १ ते ७ करिताः</u>**

**६.** सदरचे मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्याने वारंवारता टाळण्याकरिता एकत्रीतरित्या विचारात घेण्यात येत आहेत. आरोपीवरील दोषारोप सिध्द करण्याकरिता अभियोग पक्षाच्या वतीने साक्षीदार क्र. १ फिर्यादी राजेंद्र यास तपासण्यात आले. सदर साक्षीदाराने त्याच्या पुराव्या दरम्यान कथन केले आहे की, जखमी त्याचा भाऊ आहे. दिनांक २०/१/२०२२ रोजी त्याचा भाऊ रोशन व त्याचा मित्र युवराज परब हे दोघे मोटार सायकलने शिरोडा येथून येत असताना न्हावेली तिठा येथे पांढऱ्या रंगाचा मॅक्झीमो टेंपो चुकीच्या दिशेने रस्त्यावर थांबला होता. त्याचा भाऊ सदर गाडीला पाठीमागे धडकला व त्यास गंभीर दुखापत झाली. त्याच्या मित्रांनी त्यास सावंतवाडी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. ओंकार माळी याने फोन करुन अपघाताची खबर दिली. त्यानंतर त्याने भावाला बांबुळी येथे दाखल केले. तो बेशुध्द अवस्थेत

होता. १९ दिवसांनी त्यास डिस्चार्ज मिळाला व पुढे सहा महिने त्याचा उपचार चालला. त्यामुळे दिनांक २३/६/२०२२ रोजी फिर्यादीने पोलिस स्टेशनला फिर्याद (नि. ०७) दाखल केली. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासा दरम्यान सदर साक्षीदाराने घटनास्थळ हे वर्दळीचे ठिकाण असल्याचे कबुल केले आहे. तसेच अपघाताची खबर त्याच्या भावाचे मित्र किंवा त्याची पत्नी देखील देवू शकली असती हे कबुल केले आहे.

**७.** साक्षीदार क्र. २ गणेश हा पंच साक्षीदार आहे. सदर साक्षीदाराने पुराव्या दरम्यान कथन केले आहे की, दिनांक २४/६/२०२२ रोजी पोलिसांनी त्यास पोलिस स्टेशनला बोलाविले होते. महिंद्रा मॅक्झीमो गाडी क्र. जी.ए.०७/एफ–३७१० व मोटार सायकल क्र. एम. एच.०७/ए. एन–६७६३ पोलिस स्टेशनच्या आवारात उभ्या होत्या. मॅक्झीमो गाडीचा पाठीमागील भाग चेपलेला दिसला व मोटार सायकलचा समोरचा भाग पूर्ण मोडलेला होता. पोलिसांनी त्याच्यासमक्ष गाड्यांचा पंचनामा (नि. ०९) तयार केला. उलटतपासा दरम्यान सदर साक्षीदाराने कथन केले आहे की, पोलिसांनी त्यास लेखी नोटीस दिली नव्हती. पंचनामा ज्या अपघाता संदर्भात केला तो अपघात दिनांक २३/६/२०२२ रोजी झाला होता.

८. साक्षीदार क्र. ३ शरद हा घटनास्थळ पंच आहे. त्याने पुराव्या दरम्यान कथन केले आहे की, दिनांक २४/६/२०२२ रोजी पोलिसांनी त्यास न्हावेली चौकेकरवाडी येथे घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी बोलाविले होते. घटनास्थळ कोणी दाखवले हे त्यास सांगता येणार नाही. पोलिसांनी त्याच्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा (नि. ११) तयार केला. उलटतपासा दरम्यान सदर साक्षीदाराने अपघात पाच ते सहा महिन्यापूर्वी झाला होता व अपघातातील वाहने घटनास्थळावर उपस्थित नव्हती हे कबुल केले आहे. घटनास्थळ हे वर्दळीचे ठिकाण आहे व तेथे रहाती घरे आहेत हे देखील मान्य केले आहे. सदर साक्षीदाराने पुढे तो पोलिसांना नेहमी पंच म्हणून मदत करतो हे कबुल केले आहे.

९. साक्षीदार क्र. ४ रोशन हा जखमी साक्षीदार आहे. त्याने पुराव्यात कथन केले आहे की, दिनांक २०/१/२०२२ रोजी तो त्याच्या मित्रांसोबत शिरोडा बिचवर गेला होता. तो होंडा शाईन मोटार सायकल क्र. एम्.एच्.०७/ए. एन–६७६३ घेवून गेला होता. त्यावेळी त्याचा मित्र युवराज परब हा मागे बसला होता. संध्याकाळी ५.३० वाजण्याच्या सुमारास तो सावंतवाडीला येत असताना समोरुन सावंतवाडीच्या दिशेने येणारा महिंद्रा मॅक्झीमो टेंपो क्र. जी.ए. ०७/ए. एन. ३७१० उजव्या दिशेला इंडिकेटर न दाखवता वळला. त्यामुळे त्याचा मोटार

सायकलवरील ताबा सुटला. सदर अपघातात त्याच्या डाव्या हाताला,डाव्या पायाला व डोक्याला मार लागला होता. बांबुळी हॉस्पीटलमध्ये त्याच्यावर दोन आठवडे उपचार चालु होते. सदर अपघात आरोपीच्या चुकीमुळे झाला होता. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासा दरम्यान सदर साक्षीदाराने घटनेनंतर तो कोमात असल्यामुळे त्याने तक्रार दिली नाही असे कथन केले आहे. सदर साक्षीदाराने अपघात झाला त्यावेळी त्याचे मित्र पाठोपाठच होते हे कबुल केले आहे. अपघातावेळी त्याने व त्याच्या मित्राने हेल्मेट घातले नव्हते हे कबुल केले आहे.

**१०.** साक्षीदार क्र. ५ युवराज हा देखील घटनेतील जखमी साक्षीदार आहे. त्याने पुराव्या दरम्यान कथन केले आहे की, घटना दिनांक २०/१/२०२२ रोजी संध्याकाळी ५.३० वाजण्याच्या दरम्यान घडली. त्यावेळी तो रोशन पवार याच्या मोटार सायकलवर मागे बसला होता. न्हावेली तिठा येथे समोरुन येणाऱ्या मॅक्झीमो टेंपो इंडिकेटर न दाखवता उजव्या बाजुला वळल्यामुळे अपघात झाला. अपघातात त्याच्या पायाला दुखापत झाली होती व तो बेशुध्द झाला होता. त्याच्यावर बांबुळी येथे उपचार घेण्यात आले. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासा दरम्यान सदर साक्षीदाराने अपघातानंतर दोन आठवड्याने त्याला

हॉस्पीटलमधून डिस्चार्ज मिळाला तरी त्याने पोलिसांकडे अपघाताची तक्रार केली नाही. अपघातातील टेंपो कोण चालवित होते हे त्यास कळले नाही असे कथन केले आहे.

**११.** अभिलेखावर आलेल्या साक्षीदारांच्या तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपघात दिनांक २०/१/२०२२ रोजी घडला होता. अपघातावेळी मोटार सायकल साक्षीदार क्र. ४ हा चालवत होता व साक्षीदार क्र. ५ हा मागे बसला होता व त्यांच्या पाठोपाठ त्यांचे मित्र देखील होते. परंतु अपघाताची खबर साक्षीदार क्र. ४ याच्या भावाने दिनांक २३/६/२०२२ रोजी दिली आहे. सदर फिर्यादी अपघातावेळी हजर नव्हता. फिर्यादीने पुराव्यामध्ये कथन केले आहे की, अपघातातील मॅक्झीमो टेंपो रस्त्यावर चुकीच्या दिशेने थांबला होता. तर साक्षीदार क्र. ४ व ५ मॅक्झीमो टेंपो चालकाने इंडिकेटर न देता टेंपो वळविल्यामुळे अपघात झाल्याचे कथन केले आहे. घटना घडल्यापासून अंदाजे सहा महिन्यांनी घटनेची फिर्याद देण्यात आली आहे. फिर्यादीच्या कथनानुसार जखमीचे उपचार चालु असल्यामुळे त्याने फिर्याद उशीरा दाखल केली. जखमी साक्षीदार क्र. ४ व ५ यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये त्यांना दोन आठवड्यांनी डिस्चार्ज मिळाल्याचे कथन केले आहे. सबब फिर्यादीने फिर्याद दाखल करण्यास झालेल्या विलंबाकरीता

दिलेले कारण संयुक्तीक वाटत नाही. घटनास्थळ पंचनामा (नि. ११) व गाड्यांचा पंचनामा (नि. ०९) दिनांक २४/६/२०२२ रोजी करण्यात आला आहे. अपघातातील गाड्या कधी व कोठून जप्त केल्या याबाबत पुरावा आला नाही. साक्षीदार क्र. ३ घटनास्थळ पंच याच्या पुराव्यामध्ये घटनास्थळ हे वर्दळीचे ठिकाण असून तेथे लोकांची रहाती घरी असल्याचे अभिलेखावर आले आहे. घटनेवेळी आरोपी हयगयीने व वेगाने त्याच्या ताब्यातील वाहन चालवित होता हे सिध्द करण्याकरीता घटनेवेळी त्याठिकाणी उपस्थित असलेल्या प्रत्यक्षदर्शी स्वतंत्र साक्षीदाराचा जबाब नोंदविण्यात आलेला नाही. सदर अपघातात साक्षीदार क्र. ४ व ५ यांना किरकोळ व गंभीर दुखापत झाली हे दाखवणारा कागदोपत्री पुरावा देखील अभिलेखावर आला नाही. तसेच आरोपी विनापरवाना वाहन चालवित होता व त्याच्याकडे वाहनाची कागदपत्रे उपलब्ध नव्हती हे दाखवणारा पुरावा अभिलेखावर आला नाही. तपासि अंमलदार यांची साक्ष नोंदविण्यात आली नाही. जखमींचे वैद्यकिय प्रमाणपत्र दाखल करण्यात आले नाही. अशा परिस्थितीत आरोपीविरुध्द असलेले दोषारोप संशया पलिकडे जावून सिध्द करण्यास अभियोग पक्ष असमर्थ ठरला आहे. सबब मुदृदा क्र. १ ते ६ चे उत्तर नकारार्थी देण्यात येत असुन मुद्दा क्र. ७ करिता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

// // स. के. नं. **४१२/२०२२**
न्यायनिर्णय

## <u>आदेश</u>

१. आरोपीस भारतीय दंड संहिता कलम २७९, ३३७, ३३८ व मोटार वाहन कायदा कलम १८४, १३०/१७७, ३(१)/१८१ खालील गुन्हयातुन फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे वैयक्तिक बंधपत्र व जातमुचलका रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७–अ अन्वये रक्कम रु. १५,०००/– चे जामीन व वैयक्तिक बंधपत्र दाखल करुन अपीलात हजर राहण्याची ग्वाही दयावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित केला. )

JAHEDA MOHMED MISTRY
Digitally signed by JAHEDA MOHMED MISTRY
Date: 2026.06.24 15:40:01 +0530

सावंतवाडी (जा.म. मिस्त्री)
दिनांकः २४/०६/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
सावंतवाडी